**मेढा पोलीस ठाणे**
**ता.जावली जि.सातारा पिन नं.४१५०१२**
ई.मेल :-
medhaps.satara@mahapolice.gov.in
दुरध्वनीक्रमांक :- ०२३७८-२८५२३३


जावकक्रमांक :- /२०२६, मेढा पोलीस ठाणे जि.सातारा, दिनांक :- ३१/०३/२०२६

# प्रेसनोट दिनांक-३१/०३/२०२६

## ( मारामारीच्या गुन्हयातील आरोपींना सश्रम कारावास )

दिनांक-०७/०२/२०१९ रोजी सकाळी १०.४५ वा. चे सुमारास मौजे शिंदेवाडी पो. दापवडी ता. जावली जि. सातारा गांवचे हद्दित, जमिन गट नं. ३७/११ मध्ये गुन्हयातील फिर्यादी श्री. विनोद हणमंत चव्हाण (व्यवसाय-कन्ट्रक्शन) रा. चिखखली ता. वाई जि. सातारा हे त्यांचे पोकलॅन्ड मशिनचे चालू असलेले काम पाहणे करता गेले असता आरोपी १) लक्ष्मण सदाशिव शिंदे २) सुरेश सिताराम शिंदे ३) अक्षय बाजीराव शिंदे सर्व रा. शिंदेवाडी, पो. दापवडी, ता. जावली जि. सातारा हे पोकलॅन्ड मशिनचे समोर कसलातरी धार्मिक विधी करीत असल्याचे दिसल्याणे फिर्यादी विनोद हणमंत चव्हाण यांनी त्यांना "तुम्ही येथे काय करीत आहात" असे विचारले असता आरोपी यांनी "आम्हाला तु कोण विचारणारा" असे म्हणून चिडून जावून फिर्यादी यांना आरोपी क्र- १ याने साईटवर पडलेल्या लोखंडी सळईने उजवे डोळयाचे भवईवर मारुन दुखापत केली. तसेच आरोपी क्र-२ व ३ यांनी फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ, दमदार्टी केले बाबत मेढा पोलीस ठाणे गु.र.नं. २२/२०१९ भा.द.वि. कलम- ३२४, ३२३, ५०४, ५०, ३४ प्रमाणे दिनांक- ०७/०२/२०१९ रोजी गुन्हा दाखल करणेत आलेला होता.

सदर गुन्हयाचे न्यायालयीन कामकाज मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. मेढा यांचे न्यायालयात चालवले असून आज दिनांक ३१/०३/२०२६ रोजी डॉ. श्री. व्ही. ए. आव्हाड मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. मेढा यांनी गुन्हयातील आरोपी १) लक्ष्मण सदाशिव शिंदे यास १ वर्षाचा सश्रम कारावास व २,०००/- रु. दंड तसेच आरोपी २) सुरेश सिताराम शिंदे ३) अक्षय बाजीराव शिंदे यांना ६ महिण्याचा कारावास व प्रत्तेकी ५००/- रु. दंड अशी शिक्षा सुनावलेली आहे.

सदर गुन्हयाचा तपास आय.डी. मेटकरी पोलीस नाईक ब.नं. ४५ यांनी करुन आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. गुन्हयाचे न्यायालयीन सुनावणी मध्ये सरकारी अभियोक्ता म्हणून श्री. एस. पी. कणसे यांनी कामकाज पाहिले असून मा. सुधीर पाटील सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शना खाली पैरवी आधिकारी म्हणून मेढा पोलीस ठाणेचे पोलीस अंमलदार श्री. सागर मोरे यांनी काम पाहिले आहे.

(मा. पोलीस अधिक्षक सो सातारा यांचे मान्यतेने )

प्रति,
सर्व संपादक, सातारा जिल्हा.